# वार्ता टिपण ता.०६/१०/२०१८

## खंडणी विरोधी पथकाकडुन किंमत रुपये ०६,१०,०००/- रुपयांच्या विवीध कंपन्यांच्या २० मोटारसायकल जप्त

पुणे शहरातील दुचाकी वाहनचोरीच्या गुन्ह्यांना प्रतिबंध व्हावा म्हणुन मा.वरीष्ठांनी मार्गदर्शनपर सुचना दिलेल्या होत्या. त्यानुसार खंडणी विरोधी पथक गुन्हे शाखा पुणे शहर चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री रघुनाथ जाधव यांनी त्यांच्या अधिनस्त अधिकारी व कर्मचारी यांना सुचना दिल्या होत्या. त्यानुसार त्यांच्याकडील अधिकारी व कर्मचारी हे पुणे शहरात गस्त घालीत असताना, पोलीस कर्मचारी प्रकाश मगर व मंगेश पवार यांना त्यांच्या विश्वासु बातमीदाराकडुन बातमी मिळाली की, इसम नामे वैभव शिंदे व अभिषेक ऊर्फ पांडु जगधने रा.धामणगांव पाट,ता. अकोले, जि.अहमदनगर यांनी सुमारे ०२ ते ०३ वर्षापासुन नाशीक,संगमनेर ओतुर व पुण्यातुन मोठ्या प्रमाणात बजाज पल्सर,हिरो होन्डा पॅशन प्रो,हिरो होन्डा स्प्लेंडर व हिरो डिलक्स या दुचाकी गाड्या चोरल्या आहेत व ते दुचाकी गाडी चोरण्यासाठी प्रायव्हेटरोड,ताडीवालारोड व ससुन हॉस्पीटल येथे आलेले आहेत अशी बातमी मिळाली. सदर बातमीची शहानिशा करण्यासाठी पोलीस निरीक्षक श्री रघुनाथ जाधव यांनी ०२ पथके तयार करुन त्यांना रवाना केले. त्यानंतर वर नमुद दोन्ही इसम नामे १) अभिषेक ऊर्फ पांडु अरुण जगधने वय १९ वर्षे रा. मु.पो.धामणगांव पाट ता.अकोले जि.अहमदनगर २) वैभव ऊर्फ पप्पु रामभाऊ शिंदे वय २२ वर्षे व्यवसाय काहीनाही, रा.मु.पो. धामणगांव पाट, ता.अकोले ,जि. अहमदनगर यांना दि.०३/१०/२०१८ रोजी पकडुन त्यांना बंडगार्डन पोस्टे गुरनं २५४/२०१८ भादवि कलम ३७९,३४ मध्ये अटक केली आहे. त्यांची मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्याया.क्र.०३ पुणे यांनी दि.०६/१०/२०१८ रोजी पर्यंत पोलीस कोठडी दिली आहे.

नमुद आरोपींकडे पोलीस कोठडी मुदतीत तपास करता आरोपी नामे अभिषेक ऊर्फ पांडु अरुण जगधने याच्याकडुन त्याच्या गांवाजवळुन एकुण किंमत रुपये ०६,१०,०००/- रुपयांच्या विवीध कंपन्यांच्या २० मोटारसायकल जप्त केलेल्या आहेत.

**सदर आरोपींकडे केलेल्या तपासात नाशिक शहरातील एकुण ०२ गुन्हे, संगमनेर येथील ०३ गुन्हे व ओतुर जिल्हा पुणे येथील ५ गुन्हे असे एकुण १० गुन्हे उघडकीस आलेले आहेत.उर्वरीत जप्त १० दुचाकी वाहनांबावत, आरोपींकडे तपास चालु असुन नाशिक,संगमनेर,ओतुर व त्यालगतच्या भागातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की,** ज्यांच्या वर नमुद कंपनीच्या दुचाकी गाड्या चोरीस गेल्या असतील त्यांनी खंडणी विरोधी पथक गुन्हे शाखा पुणे शहर येथे पोलीस हवालदार प्रमोद मगर मोबाईल नंबर ९९२३६९५५१० व खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा पुणे शहर फोन नंबर-०२०/२६२०८२४२ यावर संपर्क करावा, ही विनंती..

सदरची कारवाई ही मा.सहा. पोलीस आयुक्त श्री. समीर शेख सो यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक श्री.रघुनाथ जाधव, पोलीस उपनिरीक्षक राहुल घुगे, पोलीस कर्मचारी प्रमोद मगर, धिरज भोर, फिरोज बागवान, महेश कदम, मनोज शिंदे, प्रदीप शिंदे, शिवानंद बोले, संतोष मते, नारायण बनकर यांनी केली आहे.

